**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २७/२०१८-१९/ 204 दिनांक: २८.०८.२०१८

**आदेश**

**आदेश केस क्र. २७(२०१८-२०१९)**

चेअरमन
शिक्षण संस्था, १४३० ई वॉर्ड कसबा बावडा
कोल्हापूर — **अर्जदार**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
शहर विभाग कोल्हापूर

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि.कं.मर्या.
उत्तर उपविभाग कोल्हापूर — **पक्षकार**

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

प्रस्तुतची तक्रार अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय कोल्हापूर यांच्या दिनांक १७.०५.२०१८ च्या आदेशाने व्यथीत होऊन, दाखल केलेली आहे.

थोडक्यात हकीकत अशी की, तक्रारदार शिक्षण मंडळ, हे अभियांत्रिकी महाविद्यालय चालवित असून सदर कॉलेजचा अभ्यास क्रमांचा एक भाग असल्याने वर्कशॉप करता विद्युत पुरवठा घेण्यात आलेला आहे. सदर विज पुरवठा औद्योगिक वर्गवारी खाली मंजूर करण्यात आलेला आहे. सदर वर्कशॉपचा उपयोग सुतार काम व लोहार काम शिकवण्याकरता करण्यात येत होता. सदरचे वर्कशॉप काही वर्षापुरवी बंद करण्यात येऊन त्या ठिकाणी सदर महाविद्यालयाचे माहिती तंत्रज्ञान विभाग सुरु करण्यात आलेले आहे. माहे फेबुवारी २०१८ मध्ये अचानकपणे जून २०१५ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीकरता औद्योगिक (LTVB) ते मधून सार्वजनिक सेवा (LTXB) हया वर्गवारीत झालेल्या बदलाच्या विज बिलातील फरकाचे रक्कम रु. ३,३४,९७६.१२ बिल तक्रारदारास देण्यात आलेले आहे. सार्वजनिक (LTXB) हा टॅरिफ कोड सन २०१५ मध्ये अस्तित्वांत आला ज्यावेळेला सदर ठिकाणी महाविद्यालयाचे वर्कशॉप होते. त्यावेळेला सदरचा कोड अस्तित्वांत नव्हता तक्रारदाराचे कथनानुसार (LTXB) टॅरिफ कोड अस्तित्वांत आल्यानंतर जर विज वितरण कंपनी तर्फे टॅरिफ बदला संदर्भात एकदा नोटीस तक्रारदारास देण्यात आली असती तर तक्रारदाराने आपला टॅरिफ कोड बदलून घेतला असता व त्याप्रमाणे बिल भरले असते. आपल्या विद्युत कनेक्शनला कोणता टॅरिफ कोड लागू होतो व तो केव्हापासून लागू होतो हे ग्राहकास माहिती असेलच असे नाही. तथापि नोटीस आल्याच्या तारखेपासून नवीन टॅरिफ कोड प्रमाणे तक्रारदाराची बिल भरण्याची हरकत नाही. अशा कथनावरुन तक्रारदाराने कनेक्शन तपासणी पासून पुढे नवीन दराने विज आकारणी करण्यात यावी व मागील फरकाची रक्कम मागणी रद्द करण्यात यावी अशी मागणी केली. अतर्गत तकार निवारण कक्षापुढे वि.प.कंपनीचे कथन असे होते की, अतिरिक्त कार्यकारी अभियंता फिरते पथक, कोल्हापूर /८३ दिनांक २६.०२.२०१८ पत्रानुसार तक्रारदाराचे असेसमेंट टॅरिफ (LTVB) ते सध्याचे टॅरिफ (LTXB) वाणिज्य परिपत्रक क्र. २४३ नुसार फरकाचे बिल रक्कम रु. ३,३४,९७६/- ग्राहकास अदा करण्यात आलेले असून ते फरकाचे बिल भरुन तक्रारदाराने विज वितरण कंपनीस सहकार्य करावे.

अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने आपले दिनांक १७.०५.२०१८ चे आदेशाने एक ओळीच्या आदेशाने , कुठलीही कारणमिमासा न करता तक्रारदाराची फरकाच्या रक्कमेची रद्द करण्याची मागणी फेटाळून लावली आहे. सबब तक्रारदाराने प्रस्तुत अपिल दाखल केलेले आहे. अपिल देखिल तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्षा समोर उपस्थित केलेला वाद या मंचासमोर उपस्थित करुन त्याच मागण्या केलेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणाची नोटीस बजावल्यानंतर वि.प. कंपनीने अतिरिक्त कार्यकारी अभियंता उत्तर उपविभाग कोल्हापूर यांचे मार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे मांडलेले असून त्यात असे कथन केलेले आहे, की प्रस्तुत ग्राहक /तक्रारदार यांनी दिलेल्या औद्योगिक विज पुरवठया वरुन Public service (LTXB) या वर्गवारीतून सदर विज कनेक्शनचा वापर केल्याचे फिरते पथक यांच्या निदर्शणास आलेले आहे. सदर वापर बदलाची कल्पना तक्रारदार ग्राहकांकडून उपविभागीय कार्यालयास देण्यात आलेली नाही. त्यामुळे अतिरिक्त कार्यकारी अभियंता भरारी पथक कोल्हापूर यांचे दिनांक २६..०२.२०१८ चे स्थळ तपासणी अहवालानुसार औद्योगिक ते Public service (LTXB) फरकाच्या थकबाकीचे पुरवणी देयक देण्यात आलेले होते. त्याबाबत तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली असता सदरची तक्रार फेटाळण्यात आलेली आहे असे म्हणणे मांडले.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी दिनांक २३.०८.२०१८ घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदारतर्फे श्री मयूर सादळे हे प्रतिनिधी व वि.प.कंपनीतर्फे श्री व्ही.जे चोपदार, सहाय्यक लेखापाल , उत्तर उपविभाग कोल्हापूर हे हजर होते. त्या उभय पक्षकाराचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर व उपलब्ध कागदपत्रावरुन या मंचाच्या निष्कर्षाकरता खालील मुद्दे उपस्थित होतात.

| मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|
| १) तक्रारदाराच्या विज वापरास पुर्वलक्षी प्रभावाने वर्गवारी लागू करुन वर्गवारीनुसार मागील फरकाची मागणी करणे कायदेशीर आहे काय ? | नाही |
| २) तक्रारदार ग्राहकाची मागणी योग्य आहे काय ? | होय |
| ३) अंतिम आदेश | खालील प्रमाणे |

आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

## कारणे

**मुद्दा क्रमांक १ ते ३:-** प्रस्तुत प्रकरणांची बहुतांशी बाबी उभय पक्षकाराना मान्य आहेत. तक्रारदारास महाविद्यालयातील वर्कशॉपकरता औद्योगिक वर्गवारीतून विद्युत कनेक्शन देण्यात आलेले होते, व त्याप्रमाणे विज आकारणी होत होती .ही बाब उभयपक्षी मान्य आहे. सदरचे वर्कशॉप अभियांत्रिकीय विद्यार्थ्यांना काही शिक्षण देण्याकरता वापरले जात होते ही बाब वि.प. कंपनीने अमान्य केलेली नाही. तसेच काही कालावधीपासून त्या ठिकाणचे वर्कशॉप बंद करुन माहिती तंत्रज्ञान विषय शिकवण्याकरता, सदर इमारतीचा व विद्युत कनेक्शनचा वापर केला जातो हे कथन वि.प.कंपनी अमान्य केलेले नाही. किंबहुना भरारी पथकाच्या निर्दशनास सदर विद्युत कनेक्शन वापरातील बदल आला, अशी वि.प. कंपनीचीच केस आहे. सदर भरारी पथकाचे स्थळ तपासणी दिनांक २६.०२.२०१८ रोजी झाली अशी वि.प. कंपनीची केस आहे. भरारी पथकाच्या सदर स्थळ तपासणीनुसार जून २०१५ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीतील वर्गवारी बदलाचे पुरवणी देय तक्रारदारास देण्यात आलेले आहे. अशी वि.प. कंपनीची केस आहे. भरारी पथकाच्या निदर्शनास आलेला वर्गवारीबदल वापर हा नेमका जून २०१५ पासून आहे. हे भरारी पथकाने कोणत्या बाबीवरुन निश्चित केलेले आहे हे वि.प.कंपनीने स्पष्ट केलेले नाही. जून २०१५ पासूनच वर्गवारी बदल आणि वापर बदल झालेला आहे. हया निष्कर्षावर भरारी पथक कसे आले याबद्दल कोणतेही स्पष्टीकरण वि.प. कंपनीकडून देण्यात आलेले नाही. मा. विद्युत लोकपाल यांनी प्रकरण क्रमांक ३ व ४/२०१६ मधील दिनांक १५.०२.२०१६ च्या आदेशाने विज दर संकेतांकातील बदल पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाही. असे स्पष्ट केलेले आहे व त्याकरिता विज नियामक आयोगाच्या केस क्र. २४/२००१ मधील दिनांक ११.०२.२००२ च्या आदेशाचा संदर्भ दिलेला आहे. सदर प्रकरणात मा. विज नियामक आयोगाने खालील प्रमाणे निष्कर्ष नोदविलेला आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

"No retrospective recovery of arrears can be allowed on the basis of any abrupt reclassification of consumer even though the same might have been pointed out by the Auditor. Any reclassification must follow a definite process of natural justice and the recovery, if any would be prospective only as the earlier classification was done with a distinct application of mind by the competent people . The same cannot be categorized as an escaped billing in the strict sense of the term to be recovered retrospectively."

त्यानुसार दि. २८.०२.२०१८ च्या पुरवणी देयका मधील मागील कालावधीकरता केलेली कथीत थकबाकीची मागणी कायदेशीर असल्याचे म्हणता येत नाही. हया कारणाकरिता तक्रारदाराची तक्रार अमान्य करता येत नव्हती व ती तक्रार अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने अयोग्यरित्या काही कारण न देता खारीज केलेली आहे. असा या मंचाचा स्पष्ट निष्कर्ष आहे. दिनांक २८.०२.२०१८ च्या पुरवणी बिलातील मागील थकबाकीची रक्कम सर्वस्वी अयोग्य व बेकायदेशीर आहे व ती रद्द करावी लागेल असा या मंचाचा स्पष्ट निष्कर्ष आहे. सबब मुद्दा क्रमांक एक उत्तर हाकारार्थी दिलेले आहे.

सबब आम्ही खालील आदेश पारित करत आहोत.

## आदेश

१) प्रस्तुतची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.
२) दिनांक २८.०२.२०१८ पुरवणी बिलातील जून २०१५ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीतील थकबाकीच्या रक्कमेची मागणी बेकायदेशीर व अयोग्य असल्याचे याद्वारे जाहीर करण्यात येऊन ते देयक रद्दबादल ठरविण्यात येत आहे व ते देयक रद्द करण्यात यावे. असा आदेश विज वितरण कंपनीला देण्यात येत आहे.
३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| 23/8/18 | 23/8 | 23/8 |
| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण